24 DEC 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अकृषीतील एकमेव 'सैफ' विद्यापीठात

## प्रा डॉ. आर. जी. सोनकवडे यांचा अनुभव ठरतोय उपयुक्त

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** आयआयटी मुंबई नंतर महाराष्ट्रातील अकृषी विद्यापीठात असणारी एकमेव सैफ (एसएआयएफ) सेंटर शिवाजी विद्यापीठामध्ये आहे. प्रा डॉ. आर. जी. सोनकवडे हे त्याचे केंद्रप्रमुख आहेत. प्रा. सोनकवडे संशोधन आणि तंत्रज्ञान विषयक जागृती आणि प्रसार व्हावा म्हणून विशेष प्रयत्न करत असतात. त्यांचा हा तांत्रिक आणि प्रशासकीय अनुभव या केंद्रासाठी खूप उपयुक्त ठरत आहे.

याआधी त्यांनी दिल्ली येथील न्यूक्लियर सायन्स सेंटरमध्ये वरिष्ठ संशोधक पदावर २० वर्षे काम केले आहे. काही दिवसांपूर्वीच त्यांना सॉलिड स्टेट न्यूक्लियर डिटेक्टर या विषयावर पेटंट झाले. संशोधनाचे महत्त्व लक्षात घेता संशोधकांना कोणत्याही अडचणीशिवाय संशोधन करता यावे यासाठी वेगवेगळ्या पातळीवर प्रयत्न होत आहेत. त्याच अनुषंगाने संशोधकांना त्यांच्या संस्थांमध्ये अत्याधुनिक विश्लेषणात्मक उपकरणे उपलब्ध करून देण्यासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालय, भारत सरकारकडून सैफ केंद्राची सुरुवात करण्यात आली. दरवर्षी जवळजवळ १६,००० संशोधक देशभरातील विविध सेफ केंद्रामध्ये या सुविधांचा वापर करत असतात. या व्यतिरिक्त, संशोधकांमध्ये त्यांच्याबद्दल जागरुकता निर्माण करण्यासाठी आणि तंत्रज्ञांसाठी उपकरणांची देखभाल, दुरुस्ती आणि विश्लेषणात्मक तंत्रांचा यावर या केंद्रात नियमितपणे अभ्यासक्रम आयोजित केले जातात. यामध्ये फोरिअर इन्फ्रारेड स्पेक्टोस्कोपी, गॅस क्रोमॅटोग्राफी मास स्पेक्ट्रोस्कोपी (जीसी-एमएस), आदी उपकरणांची भर पडली आहे. वैज्ञानिक विश्लेषणात अत्यावश्यक आणि सर्वांना सहजासहजी उपलब्ध न होणारी एक्स-रे फोटोइलेक्ट्रॉन स्पेक्ट्रोस्कोपी (एक्सपीएस) आणि ट्रान्समिशन इलेक्ट्रॉन मायक्रोस्कोप (टीईएम) अशी एकूण १४ उपकरणे येथे आहेत.

24 DEC 2021

लोकसत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### कुलगुरूंची ३० दिवसांत नियुक्ती करण्याचे राज्यपालांवर बंधन, मंत्र्यांना माहिती देणे विद्यापीठांना अनिवार्य

# विद्यापीठ कायदा सुधारणा विधेयक सादर

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** विद्यापीठाचे प्र-कुलपती म्हणून विद्यापीठाच्या विद्या आणि प्रशासकीय कामकाजाशी संबंधित मागविलेली माहिती उच्च व तंत्रशिक्षणमंत्र्यांना देणे विद्यापीठांना बंधनकारक तसेच कुलगुरूपदासाठी शासनाने शिफारस केलेल्या दोन नावांपैकी एकाची ३० दिवसांत नियुक्ती करण्याची राज्यपालांवर कालमर्यादा घालण्याची तरतूद असलेली सुधारणा विद्यापीठ कायद्यात सुचविण्यात आली आहे.

विद्यापीठ कायद्यात सुधारणा करणारे विधेयक उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी विधानसभेत सादर केले. राज्यपालांच्या अधिकारांना कात्री



विधिमंडळ अधिवेशन

लावण्याच्या महाविकास आघाडीच्या प्रस्तावाला भाजपने आधीच विरोध दर्शविला आहे. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री हे विद्यापीठाचे प्र-कुलपती असतील अशी तरतूद या विधेयकात करण्यात आली आहे. उच्च व तंत्रशिक्षणमंत्र्यांना विद्यापीठाशी संबंधित सारी माहिती देणे प्रचलित कायद्यात विद्यापीठांवर बंधनकारक नाही. कायद्यात सुधारणा करताना प्र-कुलपती या नात्याने विद्यापीठाशी संबंधित सारी माहिती उच्च व तंत्रशिक्षणमंत्र्यांना देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

कुलपती आपले काही अधिकार हे लेखी आदेशान्वये प्र-कुलपतींकडे सोपवतील. लेखी आदेशान्वये सोपविण्यात आलेल्या कुलपतींच्या अधिकार आणि कर्तव्याचे प्र-कुलपती पालन करतील. कुलपतींच्या अनुपस्थितीत प्र-कुलपती विद्यापीठांच्या दीक्षांत समारंभाचे अध्यक्षस्थान भूषवतील.

## राज्य सरकारला जास्त अधिकार

**कुलगुरू नियुक्तीसाठी प्रचलित कायद्यात 'कुलपतींच्या विचारार्थ' अशी तरतूद आहे. त्याऐवजी 'राज्य शासनाकडे' हा मजकूर समाविष्ट केला जाईल, अशी सुधारणा करण्यात आली आहे. यानुसार कुलगुरूंच्या निवडीत कुलपती तथा राज्यपालांऐवजी राज्य शासनाला जादा अधिकार प्राप्त होणार आहेत.**

### कुलगुरूंच्या नियुक्तीसाठी कालमर्यादा

कुलगुरू नियुक्तीसाठी राज्य शासनाकडून नियुक्त करण्यात येणाऱ्या समितीकडून दोन जणांच्या नावांची शिफारस राज्यपाल तथा कुलपतींना केली जाईल. कुलपती या नात्याने राज्यपालांनी ३० दिवसांच्या आत दोन नावांपैकी एकाची कुलगुरू म्हणून नियुक्ती करण्याची तरतूद कायद्यात करण्यात आली आहे. कुलपतींनी ही दोन्ही नावे फेटाळल्यास त्याच समितीकडून अथवा नवीन समिती नेमून राज्यपालांना दोन नावांची पुन्हा शिफारस केली जाईल. राज्यपालांवर ३० दिवसांच्या आत निर्णय घेणे प्रस्तावित कायद्यात बंधनकारक करण्यात आले आहे.

विधान परिषदेवरील १२ नामनियुक्त आमदारांच्या नियुक्तीकरिता यादी सादर करून वर्ष उलटले तरी राज्यपालांनी अद्यापही निर्णय घेतलेला नाही. हा अनुभव लक्षात घेऊनच सरकारने शिफारस केलेल्या दोनपैकी एका नावावर शिक्कामोर्तब करण्याकरिता कालमर्यादा निश्चित केल्याचे उच्चपदस्थांकडून सांगण्यात आले.

सकाळ

# विज्ञान, तंत्रज्ञान मंत्रालयाकडून प्रा. सोनकवडे यांना नामांकन

**कोल्हापूर :** भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाकडून प्रा. आर. जी. सोनकवडे यांचे भारतीय अभियांत्रिकी विज्ञान आणि तंत्रज्ञान संस्था (कोलकाता) येथील 'एसएआयएफ' केंद्राच्या सुविधा देखरेख समिती सदस्यत्वासाठी तीन वर्षांसाठी नामांकन झाले आहे. काही दिवसांपूर्वीच त्यांचे सॉलिड स्टेट न्यूक्लियर डिटेक्टर या विषयावर पेटंट झाले आहे. सध्या शिवाजी विद्यापीठातील संयुक्त सुविधा केंद्र येथे 'एसएआयएफ' केंद्रप्रमुख म्हणून ते कार्यरत आहेत. दिल्ली येथील न्यूक्लियर सायन्स सेंटरमध्ये वरिष्ठ संशोधक पदावर त्यांनी २० वर्षे काम केले आहे. याबरोबरच त्यांनी बाबासाहेब भीमराव आंबेडकर विद्यापीठ (लखनौ) येथील भौतिकशास्त्र विभागाचे अधिविभागप्रमुख, संचालक अशी पदे भूषवली आहेत. ते भौतिक विज्ञान शाळेचे अधिष्ठाता तसेच बाबासाहेब आंबेडकर केंद्रीय विद्यापीठात नोडल अधिकारी म्हणून कार्यरत होते.

24 DEC 2021 **तरुण भारत**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# एसएआयएफच्या सदस्यपदी प्रा. डॉ. सोनकवडे यांची निवड

## संशोधन क्षेत्रातील योगदानाबद्दल भारत सरकारने केला सन्मान : शिवाजी विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा

प्रतिनिधी
कोल्हापूर

भारत सरकारच्या मिनिस्ट्री ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी, डिपार्टमेंट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजीच्या कॉन्स्टीट्युशन ऑफ फॅसिलिटी मॅनेजमेंट कमिटी (एफएमसी) फॉर द सोफीस्टीकेटेड ॲनालॅयटीक इन्स्ट्रूमेंट फॅसिलिटी (एसएआयएफ) ॲट आयआयईएसटी, कोलकाताच्या (शिबपूर) सदस्यपदी नवी दिल्लीतील न्युक्लिअर सायन्स सेंटरचे माजी वरिष्ठ शास्त्रज्ञ आणि सध्या शिवाजी विद्यापीठाच्या फिजिक्स विभागात कार्यरत असणारे प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे यांची निवड झाली आहे.

मिनिस्ट्री ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी डिपार्टमेंटची देशात १५ केंद्रे आहेत. यामध्ये महाराष्ट्रातील आयआयटी मुंबई आणि कोल्हापुरच्या



शिवाजी विद्यापीठाचा समावेश आहे. या केंद्रातंर्गत देशभरातील १६ हजार संशोधक शास्त्रज्ञ आणि औद्योगिक क्षेत्रातील विविध विभाग कार्यरत आहेत. डिपार्टमेंटतर्फे या औद्योगिक संस्थांना उत्पादनासाठी, संशोधनासाठी अर्थसहाय्य, आवश्यक साधनसामग्री पुरवली जाते. या सर्व संस्थांना उत्पादन, संशोधनासाठी मार्गदर्शन करणे, त्यांना अर्थसहाय्य, साहित्य पुरवठा यावर देखरेख करणे तसेच या औद्योगिक संस्थांची उत्पादन आणि संशोधन क्षेत्रात केलेली प्रगतीवर लक्ष ठेवण्याचे काम कॉन्स्टीट्युशन ऑफ फॅसिलिटी मॅनेजमेंट कमिटी (एफएमसी) फॉर द सोफीस्टीकेटेड ॲनालॅयटीक इंस्ट्रूमेंट फॅसिलिटी (एसएआयएफ) ॲट आयआयईएसटी ही कमिटी करते. मूळचे मराठवाड्यातील उमरगा येथील असणारे डॉ. सोनकवडे नवी दिल्लीतील न्युक्लिअर सायन्स सेंटरमध्ये वरिष्ठ शास्त्रज्ञ म्हणून मोठे योगदान दिले आहे. डॉ. सोनकवडे शिवाजी विद्यापीठाच्या फिजिक्स विभागामध्ये २०१४ पासून कार्यरत आहेत. यापुर्वी त्यांनी २२ वर्ष दिल्लीमध्ये संशोधन क्षेत्रात योगदान दिले आहे. न्युक्लिअर ट्रॅक सोसायटी ऑफ इंडिया या रिसर्च संस्थेचे त्यांनी दोन वेळा अध्यक्षपद भुषविले आहे. त्यांच्याकडे असणारी पेटंट आणि संशोधन क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव याची दखल घेत त्यांची निवड केली.

### डॉ. अब्दुल कलामांबरोबर संशोधन करण्याची संधी

मिसाईल मॅन तथा माजी राष्ट्रपती (दिवंगत) डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्यासोबतही डॉ. सोनकवडे यांनी संशोधनाचे काम केले आहे. यादरम्यान दिल्ली येथे २००९ मध्ये झालेल्या आंतरराष्ट्रीय कॉन्फ्ररन्समध्ये डॉ. अब्दुल कलाम यांनी डॉ. सोनकवडे यांच्या संशोधन क्षेत्रातील योगदानाबाबत जाहीरपणे कौतुक केले होते.

**कोरोना काळात उपकरणांची निर्मिती**

कोरोनाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी, नागरिकांच्या आरोग्याच्या सुरक्षेसाठी डॉ. सोनकवडे यांनी आपल्या कल्पक संशोधनातून अल्ट्राव्हायोलेट सॅनिटायझिंग डिव्हाईस, व्हायरस किलिंग युव्ही टॉर्च, सॅनिटायजेशन करण्यासाठी उपयुक्त असणारा रोबोट तारा आदी उपकरणांची निर्मिती केली होती. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर या उपकरणांचा गौरव झाला होता.

तरुण भारत

# न्यू कॉलेजमध्ये आज जिल्हास्तरीय युवामहोत्सव

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठअंतर्गत कोल्हापूर जिल्हास्तरीय युवामहोत्सवाचे उद्घाटन आज शुक्रवारी १०.१५ वाजता महापालिका आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे यांच्याहस्ते होणार आहे. प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे चेअरमन के. जी. पाटील अध्यक्षस्थान भूषवणार आहेत. ५८ महाविद्यालयातून ९६३ विद्यार्थ्यांनी १४ कलाप्रकारासाठी सहभाग नोंदवला आहे. विद्यार्थ्यांनी नियमांचे पालन करावे, असे आवाहन न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी केले आहे. युवामहोत्सवात लोकसंगीत वाद्यवृंद, लोककला, लोकनृत्य, लघुनाटिका, मूकनाट्य, नकला, भारतीय समूहगीत आदी १४ कलाप्रकार आहेत. या कला प्रकारासाठी ८ स्टेज तयार केले आहेत. लोककला आणि लोकनृत्यासाठी २९ संघांनी सहभाग नोंदवला आहे. सहभागी विद्यार्थ्यांनी कोरोनाचे दोन डोस असलेले सर्टीफिकेट किंवा आरटीपीसीआर चाचणी सर्टीफिकेट घेऊन येणे बंधनकारक आहे.